# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २६ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०३/०१/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**०३/०१/२०२० शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ न्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | श्री. पाटील राजेंद्र झिपरु |
| ॲड.श्री.पोकळे दिलीप बबनराव | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री. खडके सुनिल वामनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री. सनकत चेतन गणेश | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. सोनवणे मुकुंदा भागवत | शेख सैईदा युसुफ |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | |

सदर सभेस मा.आयुक्त सो. श्री. उदय टेकाळे , उपायुक्त. श्री.उत्कर्ष गुटे, उपायुक्त. श्री. अजित मुठे, मुख्यलेखापरिक्षक .श्री. संतोष वाहुळे , मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली**

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.१३/१२/२०१९ व दि. २०/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.रेश्मा काळे :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**सौ. प्रतिभा देशमुख:-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.१३/१२/२०१९ व दि. २०/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. २ :-** जळगांव महानगरपालिका अंतर्गत आर.सी.एच. अंतर्गत कार्यरत वैदयकीय अधिकारी व परीचारीका यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत कार्योत्तर मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यापुर्वी मला खुलासा करायचा आहे मला दवाखान्याच्या संदर्भात एन.यु.एच.एम. अंतर्गत दवाखान्याची टिम वेगळी आहे का ? खात वेगळ असल्यामुळे जळगांव महानगरपालिकेत जेवढे दवाखाने आहे त्याच्यात केंद्र सरकारने एक स्कीम काढलेली आहे कलर्सच्या संदर्भात जिल्हा परिषद अंतर्गत कलर मारत आहे आपल्या बिल्डींगला, इतक कळत नाही का त्यांना आपल्या दवाखान्याला कलर मारत आहे, काही पत्र व्यवहार झालेला नाही का ते डायरेक्ट आपल्याच बिल्डींगला कलर मारता ते. आपल्या प्रॉपर्टीवर ते कलर मारत आहे चांगली गोष्ट आहे. पण आपल्याला ही माहिती पाहिजे या विषयावर. ते लोक खर्च करता तर त्याची माहिती त्यांनी ठेवली पाहिजे. माझ्या माहितीनुसार आपण ही काही पत्रव्यवहार केला नाही आणि जिल्हा परिषदने ही पत्र व्यवहार केला नाही. या लोकांनी व्यवस्थीत माहिती देऊन हे काम करायला पाहिजे. कोणीपण यायच कलर मारायचा हा वेगळा विषय होतो , कलर काम चांगल्यासाठी आहे पण अपुर्ण पध्दतीने करत आहे. भिंत बाजुला राहुन गेलेल्या आहे. माझी ही मागणी आहे की, दवाखान्याच्या पुर्ण भिंतींना कलर मारण्यात यावा. या लोकांनी लक्ष दिल तर ते व्यवस्थीत होईल. ते लोक लक्ष देत नाही. आपल्याला लक्ष द्यावे लागत आहे .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** मा.सभापती महोदय , सन्मा.सभागृह सन २०१३ ची ही केंद्र शासनाची ही योजना आहे आणि मागील महासभेमध्ये याचा ठराव झालेला आहे. आपले जे दवाखाने आहेत त्याकरीता या योजनेचा पत्रव्यवहार ऑलरेडी झालेला आहे. ते पत्र आयुक्त साहेबांना दाखविलेल आहे. हे जे काम आहे स्टेट गव्हर्नमेंट ने ही हे काम दिलेल आहे. आणि संपुर्ण महाराष्ट्रामध्ये हे काम सुरु आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुष्यमान भारत अंतर्गत होतय ते .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** होय , आणि हे आरोग्याच्या दृष्टीने करत आहोत आपण लोकांचे आरोग्य अजुन कसे चांगले होईल या दृष्टीने आपण ते त्या अंतर्गत आहे आणि त्यामुळे सर्व महाराष्ट्रात ते कलर करत आहेत .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हे चांगले काम आहे पण तुम्ही त्या खात्यात असल्यामुळे निधी कसा येतो काय वापरता याची संपुर्ण माहिती ठेवली पाहीजे ना .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** होय साहेब आपण पत्र व्यवहार केलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केव्हा दिले होते ते पत्र तुम्ही.

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** सर आपण ते २७/११ ला दिले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केव्हा मंजुर झालय ते .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** सर ते तिकडुनच झालेले आहे आणि आपल्याला फक्त कळविण्यात आलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब नवव्या महिन्यामध्ये मंजुर झालेले आहे ते टेंडर तुमच्या माहितीसाठी सांगतो . त्याची इन्क्वायरी करा, त्याची माहिती घ्या. आपल्याला काय आहे आपल्यालाच सुविधा भेटताहेत काही नाही तरी पण मी सांगतो आहे की व्यवस्थित पाठपुरावा करा.

**मा.आयुक्त सो :-** डॉ. मला सुध्दा हा प्रश्न पडला होता. की हे काय चालु आहे त्यानंतर मी बोलतो की आपण काय याबाबत तुम्हाला कदाचित माहिती आहे की नाही हे मला माहित नाही , तुम्हाला जर माहिती असेल तर आधीच कळवा .अजुन काही असले तर त्याची माहिती द्या नाहीतर अजुन नगरसेवकाला सुध्दा प्रश्न पडेल .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** नाही सर्व दवाखाने नाहीत सर मी माहिती घेतली आहे .

**मा.आयुक्त सो :-** ती संपुर्ण माहिती घ्या .आणि त्याचं काय आहे ते मलाही सांगा आणि त्या कंपाऊंउलाही कलर दे म्हणावं .

**मा.सभापती :-** संपुर्ण कंपाऊंडला दिला तर पुर्ण होवुन जाईल .

**डॉ.राम रावलानी , प्रमुख वैद्यकीय अधिकारी :-** मी परत माहिती घेवुन आपणांस कळवितो व कंपाऊंड ला पण होत असेल तर सांगतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा .

**श्री.चेतन सनकत :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत आर.सी.एच.फेज २ अंतर्गत काम करणाऱ्या खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा करार हा दिनांक ३१/१२/२०१९ रोजी संपत असल्याने दि.०१/०१/२०२० रोजी एक दिवसाचा खंड देऊन पुढील पुर्ननियुक्ती स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.०८/०१/२०१९ च्या अन्वये मुळ मानधनात ५ टक्के मानधन वाढ देऊन दि.०२/०१/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत दयावयाची आहे.

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नांव | पदाचे नांव | पुर्न नियुक्ती देण्याचा कालावधी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे | वैदयकीय अधिकारी | ०२/०१/२०२० ते ३१/१२/२०२० |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील | वैदयकीय अधिकारी | |
| ३ | डॉ.सोनल उमेश कुलकर्णी | वैदयकीय अधिकारी | |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार | वैदयकीय अधिकारी | |
| ५ | श्रीमती योगिता बबन बावीस्कर | परिचारीका | |

उपरोक्त नमुद अधिकारी/कर्मचारी यांचा करार हा दिनांक ३१/१२/२०१९ रोजी संपत असल्याने तसेच जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत वैदयकीय अधिकारी यांची संख्या कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.०८/०१/२०१९ च्या अधिन राहुन तसेच सदयस्थितीत देय असलेल्या मानधनात ५ टक्के वाढ देवून पूढील पुर्ननियुक्ती दि.०१/०१/२०२० या एका दिवसाचा खंड देवून दिनांक ०२/०१/२०२० ते दि.३१/१२/२०२० पर्यंत नियुक्ती देणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकुल मते** | :- | **१४** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सुचक** | :- | **दारकुंडे नवनाथ विश्वनाथ** | |
| **अनुमोदक** | :- | **सनकत चेतन गणेश** | |

**नगरसचिव :- विषय क्र. ३ :-** मनपा १७ मजली प्रशासकीय इमारत येथील सम्पवेलवर राखीव १५ एचपी सबमर्सिबल पंपसेट आवश्यक साहित्यासह रोखीने खरेदी करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.१,०९,७८२/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** स्पिकरची काय आवश्यकता आहे.

**श्री.डि.एस.खडके, पाणीपुरवठा प्रमुख :-** काही वेळेस काय होत. जुना जो पंप आहे तो वारंवार नादुरुस्त होतो. आणि आपण जास्तीत जास्त ३-४ दिवस पाणी पुरवठा बंद ठेवु शकतो. मागे ही पाणी पुरवठा दोन दिवस बंद होता. मग अशा वेळेस तो कामात येतो .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** काही हरकत नाही. परंतु मागे एक दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली होती. आणि जेथे जेथे समस्या होती तेथे पंप टाकली होती. अशी काय परिस्थिती आहे त्या पंपाची .

**श्री.विलास पाटील, कनिष्ठ अभियंता :-** शहरातील बरेच पंप चालु आहेत आणि आपण काही पंप बदलवायचे होते ते बदलवलेले आहेत. काही नादुरूस्त होते ते आपण स्पेशलन सीआरआय पंप बसविले आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** संपुर्ण शहरात आपण ज्या विहीरी साफ केल्या व खोदल्या, आणि तेथे पंप टाकुन पाईपलाईन करुन शहराला पाणी टंचाई मध्ये पाणी दिल तर त्या मोटारी आहेत का ?

**श्री.विलास पाटील, कनिष्ठ अभियंता :-** हो, आहेत. आपण जेथे जेथे मोटारी लावल्या होत्या त्या आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** बोरींग चे काय बोरींगच्या विहीरी खोदुन त्या साफ करून टाकल्या होत्या त्या आहेत का ?

**श्री.विलास पाटील, कनिष्ठ अभियंता :-** हो, काही विहीरी बुजल्या गेल्या आहेत पण बऱ्यापैकी चालु आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मी ऐकले की काही विहीरी बुजल्या गेल्या आहेत.

**श्री.विलास पाटील, कनिष्ठ अभियंता :-** हो काही विहीरी बुजल्या गेल्या आहेत आज रोजी शहरात तीन विहीरी कार्यरत आहेत . व त्या चालु आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, पाणी पुरवठा विभागा कडील मशिनरी विभागा अंतर्गत १७ मजली प्रशासकीय इमारत येथे पिणेच्या पाण्याची व्यवस्थेकरीता इमारतीच्या तळाशी सम्पवेल तयार करुन त्यावर १५ अश्वशक्ती सबमर्सिबल पंपसेट बसवून १८ व्या मजल्यावरील पाण्याची टाकीचा भरणा केला जातो व मजला निहाय पाणी पुरवठा केला जातो. सदर ठिकाणी असलेला १५ अश्वशक्ती मोनो सबमर्सिबल पंप अचानक चालु स्थितीत बंद झाला तपासणी अंती नादुरुस्त झाल्याने दुरुस्ती साठी पंप काढण्यात आला. सदरचे दरुस्ती कालावधी मध्ये दोन दिवस इमारती मधील पाणी पुरवठा व बाथरुम, शौचालया ठिकाणी पाणी नसल्याने साफसफाई करणेस अडचण आल्याने तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यांत आलेला आहे. सदर पंप वारंवार नादुरुस्त होत असल्याने अशी समस्या पुढे निर्माण होऊ नये म्हणून राखीव (Standby) विजपंप सेट असणे आवश्यक आहे. तरी सदर ठिकाणी सि.आर.आय. कंपनीचा १५ अश्व.शक्ती सबमर्सिबल विजपंप आवश्यक साहित्यासह रोखीने खरेदी करणेचे अनुषंगाने मे.मेहरे मोटर्स,जळगांव शहरातील सी.आर.आय.कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचे रु.१,०९,७८२/- मात्रचे टॅक्ससह दराबाबत प्रोफार्मा इन्व्हाईस प्राप्त झाले.

मनपा १७ मजली प्रशासकीय इमारत येथील सम्पवेलवर राखीव १५ अश्वशक्ती सबमर्सिबल विजपंप साहित्यासह विना निविदा खरेदी करणेकामी मे.मेहेर मोटार्स,जळगांव यांनी दिलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस नुसार रक्कम रु.१,०९,७८२/- मात्रच्या खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा नवीन कामे या लेखा शिर्षकाखालील रक्कमेतून करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ४ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१६/१२/२०१९ ते दि.२१/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१६/१२/२०१९ ते दि.२१/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ५ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय , माहिती घेतली परंतु कामाच प्राधान्य काय हे ठरविल जायला पाहिजे. आज संपुर्ण जळगांव शहरामध्ये विस्तारीत भागामध्ये लाईटांची प्रॉब्लम आहे. उदारणार्थ सुप्रिम कॉलनीतल्या आमचे सन्मा.नगरसेवक आमच्याकडे वारंवार तक्रारी करतात की आमच्याकडे पथदिवे नाही. अश्या पध्दतीने शहरामध्ये छोट्या छोट्या ज्या गटार असतात त्याच्यावरचे कल्व्हर्ट असतात बऱ्याच ठिकाणी ते कल्व्हर्ट तुटलेले आहे साधारणता ५-५ व १०-१० हजार रुपये खर्च करुन ते कामे केले जाऊ शकत. परंतु त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आणि तश्या पध्दतीने रु.४,३८०००/- काम ही प्राथमिकता आहे का या शहराची. मा. महोदया हे आपल्या काळातल काम नाही. हे पुर्वी झालेल काम आहे. हे काम कुठेतरी लोकसहभागातुन होणार होत. परंतु लोकसहभागातुन हे काम होऊ शकले नाही. आणि आपण याला अश्या पध्दतीने मान्यता दिलेली आहे. ही आज गरज आहे का शहराची सामान्य नागरीक जो आज या शहराचा करदाता आहे त्याला आपण प्राथमिक सुविधा देण्यापासुन वंचित ठेवतो. आणि अश्या पध्दतीने आवश्यकता नसतांना उद्यान विकसीत करणे आहे आणि त्याच्यावर रु.४,३८०००/- खर्च करणे हे या महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे योग्य आहे का ? आणि ही शहराची प्राथमिकता आहे का ? आणि जर अश्याच प्राथमिकतांना जर प्राधान्य द्यायच असेल मग सामान्य नागरीकांनी कोणाकडे जायच. आणि काय उत्तर द्यायचे त्यांना. आपला मनपाचा अभियंता उदय पाटील कल्व्हर्ट तुटलेल होत. आणि कल्व्हर्ट मध्ये पाय पडुन त्याच पाय मोडला गेला. म्हणजे लाखो रुपये सामान्य नागरीकाच्या खिश्यातुन खर्च होत आहे. परंतु सुशोभिकरणाच्या नावावरती अश्या पध्दतीने पैसांचा अपव्यय होत असेल तर निश्चितपणे ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. मला वाटत आहे की, अश्या पध्दतीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याचा विचार सभागृहाने करायला पाहिजे. मा.आयुक्त महोदयांना रु.२५ लक्ष खर्च करण्याचे अधिकार आहे. परंतु त्याची प्राथमिकता जे नागरीक इमाने ऐतबार कर देतात. त्यांना हे सुविधा देत नाही. तश्या जर सुविधा दिल्या असत्या तर आयुक्तांना २५ लक्ष काय ५० लक्ष खर्च केले असते त्याच्या संदर्भात आक्षेप नाही. येथे जर कधी त्याच्या घरामध्ये काही अडचणी राहिल्या असत्या.बाथरुम तुटलेला आहे किंवा नळ फिटींग तुटलेली आहे. की ईलेक्ट्रीक फिटींगचा घरातला काम आहे. तश्या संदर्भात खर्च केल असत तर त्याच्या संदर्भात सुध्दा आक्षेप राहिल नसत. परंतु उद्यान आणि उद्यानाच्या ईलेक्ट्रीक फिटींगवर इतका खर्च करणे हे कितपर्यंत योग्य आहे. याच समाधान करायला पाहिजे. अन्यथा अश्या विषयांना मान्यता सुध्दा द्यायला नको. नाही तर मला सांगा रु.२५ लक्ष खर्च करण्याचा अधिकार जर आयुक्तांना असतील आणि अश्या

पध्दतीने त्याच्यावर खर्च होत असेल तर तुम्ही एक आदेश द्या की, तुमच्या विभागातल्या दोन गटारी रिपेअर करायचे आहे. एक ही मक्तेदार येणार नाही. का तर तुमच्याकडे अधिकार आहेत. परंतु त्या मक्तेदाराचा काम पुर्णत्वास गेल्यानंतर त्यांची बिल अदायगी करण्याचे अधिकार तुमच्याकडे नाही. त्याच्यामुळे हे मनपा निधीतला काम आहे रु.४,३८०००/- परंतु अशी कामे करायला मक्तेदार पुढे येतात का कारण त्यांनी केलेल काम मा.आयुक्त महोदय यांचेकडील असल्याने त्यांची बिल अदायगीची जबाबदारी ही मा.आयुक्त साहेबांकडे आहे. आणि त्यांच्या शब्दानुसार केलेला काम म्हणुन तो करायला तयार आहे. परंतु तुमच्या आमच्या सारखे लोकांच्या गटारींच काम कोणही मक्तेदार मनपा फंडातुन करायला पुढे येऊन करणार नाही. अश्या पध्दतीने जर निधीचा अपव्यय होत असेल मला वाटत ते खुप चुकीच आहे. याच्यावर सभागृहाने निर्णय घ्यायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** या संदर्भात आयुक्त कार्यालयात आयुक्त निवासाच मी संबंधीत इंजिनिअरांना सांगतो या पुढे एक ही रुपय आयुक्त निवासावर खर्च होऊ नये . हे अत्यंत योग्य हे बोलले आहेत . धन्यवाद.

**श्री.नितीन लढढा :-** २५ कोटीचा निधी जळगांव मनपाला केव्हा प्राप्त झाला. आणि त्याच.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ते आयुक्तांच्या जरी बंगल्याच काम असल तरी ती प्रापर्टी महापालिकेची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ढेकळे साहेब मी सांगतो तुम्हाला तुम्ही प्रशासनाची बाजु घेऊ नका. तुमचा वार्ड बघा, ६-६ व ८-८ इंच रस्ता खोदुन चाऱ्या पडलेले आहे. काय प्रशासनाची बाजु घेत आहात तुम्ही. ठिक आहे ना. प्रापर्टी महापालिकेची आहे. मला काय वाटत एक काम करा, सगळ गांव सोडा आणि त्या आयुक्ताच्या बंगल्याला सोन्याच्या परदेच लावुन टाका.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ असाच एक विषय आहे. उपायुक्तच्या बंगल्यावरही रु.१५ लाख खर्च झालेला आहे मागच्या वेळेस. तुम्ही जे बोलत आहे ते बरोबर आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ढेकळे साहेब ज्या पध्दतीने प्रशासनाची बाजु घेत आहे. होत काय आहे. प्रभागातल्या चाऱ्या आहे मुख्य रस्त्यावर.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रशासनाची बाजु घेत नाही. सुंदरतेवर फरक पडतो. आणि महापालिकेची प्रापर्टी आहे ती.

**श्री.नितीन लढढा :-** हो. तर रस्ते महापालिकेची प्रॅाप्रटी नाही का ? ज्याच्यावर तुम्ही आम्ही लाखो लोक प्रवास करतात.

**मा.सभापती :-** आयुक्तांनी स्वत: या प्रश्नाच उत्तर देवुन दिला तरी ही आपण त्या विषयावर चर्चा करत आहात.

**श्री.नितीन लढढा :-** ताई हे बघा अजुन आयुक्तांनी माझ्या प्रश्नाच समाधान केलेल नाही. तरी सुध्दा ठिक आहे. झालेल खर्च आहे त्या बद्दल वाद नाही. परंतु एक गोष्ट जो पर्यंत आपण येथे सत्ताधारी म्हणुन येथे बसलेले आहात. आणि जो पर्यंत आपल्याला आपले अधिकार समजत नसतील आणि असे कामामुळे तुम्ही पायमल्ली घालत असाल. तर निश्चितपणे म्हणतो तुम्ही सभापती असुन सुध्दा तुम्हाला कोणी विचारणार नाही. ही परिस्थिती आहे की, आपण आपले अधिकार ओळखा की आपल्याला अधिकार काय मिळालेले आहे. अश्या पध्दतीने डोळे झाक करुन अश्या विषयांच्या माहित्या घेतल्या गेल्या तर मला सांगा लोकप्रतिनिधी म्हणुन तुमच आमच उपयोग काय येथे. ढेकळे साहेबांचच म्हणतो मी, आज सकाळीच गेलो होतो मी डी मार्ट कडे जवळ जवळ २-२ फुटाच्या ६-६ इंच खोल रस्त्यावरती खोदलेल्या चाऱ्या पडलेल्या आहे. का ती मनपाची प्रापर्टी नाही. तेथे अपघात घडतात तेथे नागरीक पडतात. ढेकळे साहेब जो हाऊस सुंदरीकरण करायचे आहे ते एका व्यशिष्ट व्यक्तीच आहे. तेथे सामान्य नागरीकाला जाण्याची एन्ट्री सुध्दा नाही. तुम्हालाही जाव लागेल तेव्हा गेट वरुन परवानगी घेऊन जावा लागेल. परंतु जे सामान्य माणसाचे जाण्याचे रस्ते वापरण्याचे रस्ते ते आपल्याला दिसुन येत नाही वाटत. अश्या पध्दतीने या विषयांवरती जो पर्यंत आपण अंकुश लावणार नाही सभापती महोदया, तो पर्यंत मी म्हणतो खरे अर्थाने लोकशाही म्हणुन आपले अधिकार खुप मर्यादीत करुन ठेवलेले आहे प्रशासकीय मंडळीनी. म्हणजे सामान्य ठेकेदाराला जेव्हा आश्वासन देऊन आपण कामे करुन घेतो. आणि त्याच्या बिलाची अदायगी करण्याची जेव्हा वेळ येते. त्यावेळेला मात्र आर्थिक निष्कर्ष लावले जातात की आज आर्थिक परिस्थिती नाही. आज पैसे देऊ शकणार नाही. मला सांगा मागच्या टर्म मध्ये निवृत्त झालेले नगरसेवकांना आजपर्यंत मानधन दिले जात नाही. एखाद्या तरी प्रशासकीय अधिकाऱ्याच मागील ५-६ वर्षापासुन वेतन थांबलेल आहे का ? कुठल्या क्लासवन ऑफिरच वेतन या महानगरपालिकेत थकित राहिला. लोक प्रतिनिधींना एक न्याय आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना एक न्याय. ही भुमिका कुठपर्यंत योग्य आहे. हे योग्य नाही.

**श्री.सुनिल खडके :-** या पुर्वी असा खर्च झालेला नाही का ? याची माहिती घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो असाच रु.१५ लाखाचा खर्च उपायुक्तांच्या बंगल्यावर झालेला आहे.

**श्री.सुनिल खडके :-** या पुर्वी वर्ष दोन वर्षा पहिले, आता पर्यंत असा खर्च झालेला आहे की नाही. त्याची माहिती द्या.

**श्री.नितीन लढढा :-** घ्या ना माहिती घ्या. तो माझा व्यक्तीगत विषय नाही. तो खर्च झालेला आहे की नाही झालेला आहे ते पाहण्याच काम तुमच आहे कारण आता तुम्ही सत्तेत बसलेले आहात. कारण हे पैसा तुम्ही वाचविला असता तर तुमचे दोन गटारीचे काम झाले असते एक जन जागृतीच काम झाल असत. मात्र जेव्हा तुमच्या आमच्या कामांच प्राधान्य येत. त्या वेळेला प्रशासन कुठेतरी आर्थिक बाबींच बागुलबुवा करत असतं मा.सभापती महोदया २५ कोटी रूपयांचा निधी या

महानगरपालिकेला केव्हा प्राप्त झाला आणि त्याचा विनियोग किती खर्ची पडलेला आहे. याच्या संदर्भातील माहिती अपेक्षित आहे.

**श्री.कपिल पवार , मुख्यलेखाधिकारी :-** १५ कोटी पर्यंत रक्कम आपल्याकडे शिल्लक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** १५ कोटी शिल्लक आहेत , आज जवळपास अडीच वर्ष झाले निधी मिळायला आणि त्यातील १५ कोटी रूपये शिल्लक आहेत. काय कारण आहे सभापती महोदया की निधी पडलेला आहे आणि इतक्या दिवसापर्यंत त्याचा विनीयोग होवु शकत नाही.

**मा.सभापती :-** त्यांना जे उत्तर अपेक्षित आहे ते आपण द्यावे .

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** निधी ची मुदत दोन वर्ष होती आपल्याला त्या कालावधीत हा खर्च व्हायला पाहीजे होता .

**श्री.नितीन लढढा :-** मी तेच म्हणतोय ना अडीच वर्ष झाले आहेत . परंतु निधीची मुदत संपुष्टात येवुन गेली व तो खर्च का झालेला नाहीये.एकीकडे आपण आर्थिक चणचण आहे या पध्दतीचे उत्तरं देत असतो .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** याचा विषय असा आहे भाऊ की सुरूवातीला आपल्याला १८ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली होती नंतर आपल्याला ७ कोटींची नुकतीच मान्यता मिळाली होती , म्हणजे मुदत संपण्याच्या दोन महिने आधी त्याच्यामध्ये आपण मोठमोठे कामं जसे लिफ्टचे कामं हे सात कोटीमध्ये आपण त्यांना कार्यादेश दिलेले आहेत.त्याला माझ्या माहिती प्रमाणे ६ महिने पण झालेले नाहीत अजुन .

**श्री.नितीन लढढा :-** नाही कार्यादेश दिले आहेत परंतु अद्याप पावेतो कार्याला सुरूवात झालेली नाहीये. अशी कामे किती कोटींची आहेत.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** साधारण १२ कोटींची आहेत. १५ दिवसांपुर्वी एका बैठकीत महापौर ताईंकडे व मा.सभापती मॅडम यांनी सर्व कॉन्ट्रक्टरला बोलावुन त्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली होती.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया गेल्या अडीच वर्षापुर्वी मिळालेल्या , आज मा.माजी मुख्यमंत्री साहेब जळगांवला आले होते , त्यांनाही दुख: होईल या गोष्टींच की मी मुख्यमंत्री असतांना २५ कोटी रूपयांचा निधी दिला .गेले अडीच वर्ष ते मुख्यमंत्र्यांचे आता माजी मुख्यमंत्री झालेले आहेत तरी सुध्दा हा २५ कोटी रूपयांचा निधी खर्ची पडलेला नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. एकीकडे आपण निधी नाही म्हणुन सातत्याने प्रयत्न करत असतो. जर २५ कोटीचा निधी विहित मर्यादे मध्ये आपण खर्चपण करत नसाल तर उद्या मिळणारा १०० कोटीचा निधी शासन कुठल्या निष्कर्षाने आपल्याला देईन. शासन परत विचारणा करेल. तुमच्याकडे दिलेल २५ कोटीच युटीलाईजेशन सर्टीफिकेट अद्यापपावेतो प्राप्त झालेल नाही. आणि तुम्ही पुन्हा १०० कोटीच्या निधीची मागणी करत आहात. का तुम्हाला निधी द्यायचा. हा प्रश्न पडेल हा प्रश्न उपस्थित होईलच. परंतु वर्षानुवर्ष हा निधी खर्चीत पडत नसेल मला सांगा याचे कारण काय ? ही गंभिर बाब आहे. निधी नसेल आणि त्या वेळेला आपण नागरीकांना उत्तर देतो की, आर्थिक अडचण आहे. पण निधी येऊन अडीच अडीच वर्षाचा कालावधी उलटला जातो तरी सुध्दा तो निधी अखर्चीत म्हणुन जवळपास १४,८८,२४,७५४/- निधी हा अखर्चीत दिसुन येत आहे. असतील काही कामे पाईपलाईन मध्ये असतील. परंतु काही कार्यादेश देऊन सुध्दा त्या कार्यादेशाचे मुदती संपुन जातील. परंतु ते कामे सुरु झालेले नाही. असे कामे रद्द करण्या संदर्भात काही निर्णय घेतलेला आहे का ? असे मक्तेदारांना ज्यांनी विहित मुदतीत कामे सुरु नाही केली. म्हणुन ते कार्यादेश रद्द करण्यात यावे. अशी काही भुमिका प्रशासनाने ठरविलेली आहे का ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** साहेबांसोबत झालेल्या बैठकीमध्ये त्या बैठकीला आपण ही होते असे जे कामे आहे त्यांना रद्द करुन त्या मक्तेदारांना ब्लॅकलिस्ट करणेची कार्यवाही करावी असे ताईंनी सुचविलेल होतं. आज त्या अनुदानाची मुदत संपलेली आहे त्या कामांना आपण या क्षणी ही रद्द करु शकतो. त्याची फेर निविदा निघु शकत नाही. आता आपल्याला जर मुदत मिळाली तर तशी कार्यवाही आपल्याला करता येईल.

**श्री.नितीन लढढा :-** या संबंधात नाही पण या पुर्वीची मक्तेदार जे असतील ही कामे तुम्ही रद्द करणार का ? कारण आता प्राथमिकता ही बदलली आहे त्या वेळेला आपल्याला अडचणी वेगळया होत्या. त्या वेळेला आपण अमृत योजनेच्या अनुषंगाने रस्तेचे कामे हाती घेवु शकत नव्हतो. म्हणुन त्यात बरेच कामे नाल्याला संरक्षण भिंत बांधणेसाठी घेतलेली होती. एक मोठया नाल्याच काम आपल्या राहत्या घराच्या मागचच आहे. परंतु मी वारंवार एकच गोष्ट सांगतो की, शहराच्या प्राथमिकता या आग्र क्रमाणे ठरविल्या गेल्या पाहिजे. नाला वाहत आहे वर्षानुवर्ष वाहत आहे तसाच वाहत आहे. आज ती प्राथमिकता नाही. ती प्राथमिकता असेल परंतु केव्हा ज्या वेळेस तुमचे रस्तेचे कामे पुर्ण झालेले असतील. नागरीकांचा प्रवास रस्त्यावर सुखसमाधानाने होत असेल. मग ज्या वेळेला निधी आपल्याकडे अतिरिक्त असेल मग त्या वेळेला नाल्याच्या सुशोभिकरण करण्याचे, खोलीकरण करण्याचे, संरक्षण भिंत बांधण्याचे किंवा जे काही आपण जॉगींग ट्रॅक बनवितो, चेनलिंग फेंसींग लावतो ही सर्व कामे प्राथमिकते मध्ये खुप शेवटच्या स्तरावर येते. अश्या पध्दतीने याच्यावर तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे. याला मुदतवाढ मिळण्याच्या संदर्भात काय पोजिशन आहे.

**मा.सभापती :-** शहर अभियंतांनी ज्या मिटींगचा उल्लेख केला त्या मिटींगला आपले विरोधी पक्षनेते श्री.सुनिल महाजन होते. सगळी वस्तुस्थिती प्रशासनाने मांडली होती आणि सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला होता.

**श्री.नितीन लढढा :-** जेव्हा एखाद्या विषयाच उद्दिष्ट तुमच्या डोळयासमोर असत. या कामाचा युटिलायझेशन या निधीचा युटिलायझेशन करणे कर्मप्राप्त आहे. शासन मुदतवाढ देतांना ही अटी का टाकुन देतो की,तुम्ही ती कामे मुदतीत पुर्णत्वास नेणे गरजेच असत. परंतु ३० नोव्हेंबर पर्यंत हा निधी खर्च नाही झाला तर याची जबाबदारी कोणावर फिक्स करणार. याला जबाबादार कोण ? प्रशासन जबाबदार आहे की, पदाधिकारी जबाबदार आहे की निर्णय प्रक्रिया मध्ये झालेला विलंब जबाबदार आहे. म्हणजे शासनाने फक्त एकच काम करायच का ? आला तुम्ही ठेवले कागद की मुदतवाढ दिली. आणि मुदतवाढ दिल्यानंतर पुन्हा ये रे माझे मागल्या या प्रमाणे कासव गतीने आपला जो प्रवास सुरु असतो पुन्हा आपण शासनाकडे जातो. म्हणजे किती गंभिर आहोत आपण विकास कामांच्या संदर्भात याच्याने स्पष्ट दिसुन येत. याला जबाबदार कोण ? गेल्या अडीच वर्षात त्याला दोनदा मुदतवाढ मिळालेली आहे. स्पष्ट शब्दात त्याच्यामध्ये लिहलेले असता की ही अंतीम मुदतवाढ आपल्याला देण्यात येत आहे. आणि तित पर्यंत ही आपण तो निधी खर्च करण्यास तयार नाही.

**श्री.सुनिल खडके :-** आता सहा महिनेतर पाऊसच चालु होता म्हणुन ठेकेदारांनी कामच चालु केलेले नाही.

**श्री.नितीन लढढा :-** आता मला सांगा पाऊस पडला आणि संपुर्ण जग ठप्प झाल का ? रेल्वे बंद पडली की, विमान सेवा बंद पडली, रस्ते वापरणे बंद केले की, लोकांनी खाणे पिणे बंद केले, करण्याची माणसिकता असती तर २४ तास.

**श्री.सुनिल खडके :-** माझ्या ही वार्डाचे काम आहे त्याच ही बांधकामाचा टेंडर निघालेल होत. जो ठेकेदार होता तो देवाचा पाणी थांबायची वाट बघत होता. नाल्याच पाणी सातत्याने वाहत याच्यामुळे विलंब झाला. आणि त्या काळात त्याची मुदत संपली, आता ते मुदतवाढ घेत आहे. आता मुदतवाढ मिळालेली आहे. ते कामे चालु करत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आपल्याकडे काही चेरापुंजी सारख पाऊस नाही पडत.

**श्री.सुनिल खडके :-** या वर्षी खुप पडल भाऊ पाणी.

**श्री.नितीन लढढा :-** पाऊस पडतो थांबतो, काम करण्यासाठी अनेक पध्दती अवलंबीले जातात. नालाचा नाला डायव्हर्ट केला जातो, ज्या दिवशी उघडी मिळेल त्या दिवशी काम केल जात. खुप चांगल्या चांगल्या टेकनिक आलेल्या आहे काम करण्याच्या संदर्भात. परंतु मनपाचे ठेकेदार आपल्याला माहिती आहे हे कसे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मी मागे ही बोललो होतो, मक्तेदारांचे कामे न करण्याच्या संदर्भात.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मक्तेदार काम करत नसतील तर त्यांच्यावर कार्यवाही करा, असे चांगले नाही, दोन दोन वर्ष काम होत नाही. ते चुकीच बोलत आहे असे काही नाही. तुमची ही बाजु घेत आहे भाऊ मी.

**श्री.चेतन सनकत :-** त्या दिवशी आपण लेखी घेतलेले होते मक्तेदाराकडुन.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** आज मुदत संपल्यामुळे आपण आज निविदा किंवा जसे भाऊ म्हटले की, प्रायरिटीनुसार ते कामे रद्द करा, आपण रस्तेचे कामे घ्या. ते प्रकरण महासभेपुढे आणाव लागेल महासभेकडुन शासनाकडे जाईन. ऐवढा कालावधी आपल्याकडे नाही भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** माझ म्हणण फक्त इतकच आहे की माझ्या प्रश्नाच मुळ उत्तरच मला मिळालेल नाही. ३० नोव्हेंबर अंतिम तारीख असतांना कामे मार्गी का लागले नाही आणि याला जबाबदार कोण ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** ३० नोव्हेंबर पर्यंत ५ महिने झाले, आपल्याकडे ४ महिने तर पाऊसच चालु होता.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** भोळे साहेब पाण्याचा विषय नाही.

**श्री.नितीन बरडे :-** त्यामध्ये सगळे कामे नाल्याचेच होते का ? नाल्याचे होते का सर्व कामे ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** रेती सुध्दा उपलब्ध नव्हती. नाल्याचे होते, गटारींचे होते, रस्त्याचे होते.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** डिव्हायडर आहे, पोल शिफ्टींग आहे, नाही होत ते कामे. किती तरी पाठपुरावा केला तर होत नाही. असे लोकांना खरच ब्लॅकलिस्ट मध्ये टाकायला पाहिजे. आमची संमती आहे, आहे का संमती आपली, काय नाइलाज आहे त्याला काम करत नसतील तर. आता यांनी माझ्या वार्डाच उदहारण दिल.माझ्या वार्डात भोळे साहेबांनी सांगितले की, खड्डे बुजण्याच काम होईल. मागच्या मिटींगला बोललो त्याच्या मागच्या मिटींगला ही बोललो. त्याच्यानंतर आमचे जे इंजिनिअर आहे त्यांच्याशी ही बातचित केली. खर्चाला जेव्हा मंजुरी घेतली तेव्हापासुन पाठपुरावा करत आलेलो आहे ही चौथी मिटींग आहे तरी ही काही नाही. आणि काम ही नाही. काय झाल भोळे साहेब खड्डे बुजण्याच काय झाल.

**श्री.नितीन लढढा :-** जेष्ठ पदाधिकाऱ्यांच असे होत असेल तर जे नवनिर्वाचित सदस्य असतील त्यांची काहीच सोय राहणार नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** खड्डे बुजण्यासाठी काय अडचण आहे मी तुम्हाला विचारत आहे. आणि रिपीट करत आहे.

**श्री.संजय नेमाडे, शाखा अभियंता :-** वार्ड क्र.१३ मध्ये चालु आहे काम, ते संपल्यानंतर वार्ड क्र.१४ मध्ये चालु होईल.

**श्री.नितीन लढढा :-** मुख्य रस्त्यांना तुम्ही प्राधान्य द्या. शिरसोली रस्त्यावर रहदारी इतक्या मोठया प्रमाणावर होत असतात. आणि जवळजवळ ६-६ इंच खोल आणि २-२ फुट रुंद अश्या पध्दतीच्या त्या चाऱ्या आहे. तो अत्यंत रहदारीचा रस्ता

आणि स्लम ब्लॅकेटस आहे. केव्हा ही एखादा अपघात चुकुन ही घडला तर समोरच्या माणसाचा जिव जाण्याची परिस्थिती तिथे निर्माण होऊ शकते ईतकी वाईट परिसिथती त्या रस्त्यावरची आहे.

**श्री.सुनिल खडके :-** वॉर्ड नं. १७ मध्ये अशोक नगरमध्ये जे गटारींचे काम आहे ते अपुर्ण सोडलयं आपण एक दिड वर्षापुर्वी गेलो होतो त्या ठिकाणी त्यांनी ते अजुनही पुर्ण केलेले नाहीये मी मागे ही तुम्हाला सांगीतले होते की त्याला ब्लॅक लिस्ट मध्ये टाका किंवा बोलावुन समजवा त्याची माहिती घेवुन ब्लॅकलिस्ट मध्ये टाकाना त्याला .

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुनिल भाऊ तुम्ही दुसऱ्यांदा सुचना मांडताहेत तरी मक्तेदार ब्लॅकलिस्टेड होत नसेल तर त्याला काय वजन पाहीजे .आपण सुचना केल्यानंतरही काडीमात्रही कामं होत नाहीयेत आणि मक्तेदार जर ब्लॅकलिस्टेड होत नसेल तर काय करायचे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** शिरसोली रोडावर एक छोटासा पुल आहे आणि त्याच्यावरून पाणी वाहतं मोठी गटार आहे जळगांव शहराच्या मोठया भागातील पाणी त्या गटारीने जात असतं . आणि तो आपण चोकअप झाल्यामुळे अर्धा भाग तोडुन टाकला आहे . आता हे चालले आहे की तो बी ॲन्ड सी चा आहे की महापालिकेचा आहे. असच चाललय तो होत नाही त्याचं काय करता येईल . आता मागच्या वेळेस साहेबांनी सांगीतले की त्याला पोखरून ठेवला आहे . कारण काय आहे की त्यामुळे मोठा ॲक्सीडेंट होण्याची शक्यता नाकारता येत नाही . त्याचा मार्ग काढावा काय काढता येईल तो व कशा पध्दतीने करता येईल.नविन पुलाचं काही बनवता येईल तर बघा .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** तो जो रस्ता आहे त्याचे काम बी.एन्ड सी कॉक्रींट चे करता आहे त्यांनी साईड पट्टया डांबरी केलेल्या आहेत आणि मोहाडी व शिरसोली चे जे जंक्शन आहे तीथ पावेतो ते कॉक्रींटीकरण करणार आहेत आंत मध्ये तो पुल आहे आणि ही गोष्ट मी पत्र देवुन त्यांच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे व आपण कार्यालयीन पत्रव्यवहार केलेले आहे त्याच्यामध्ये त्या पुलाचे काम करण्यात यावे व हाईट वाढवण्यात यावी असे त्यांना त्यात दिलेले आहे .

**श्री. नितीन लढ्ढा :-** नाही पण त्यांच्या ईस्टीमेटमध्ये याचे काम घेतलेले आहे का ?

**मा.सभापती :-** आपण जे पत्र दिले ले आहेत त्याचा फॉलोअप घ्या , त्याचा पाठपुरावा करा आणि त्यांनी काम घेतलेले आहे किंवा नाही याबाबत सभागृहाला अवगत करून द्या .

**श्री. नितीन लढ्ढा :-** तिथे राज्य शासनाच्या , आमदारांच्या मध्यस्थीने आपण करून घेवुना ते , कुठेतरी लोकप्रतिनिधी या शहराचं लोकप्रतिनिधीत्व करत असतांना या गोष्टी त्यांच्या निदर्शनास आणुन द्या. काही आपल्या अखत्यारित येत नाही तिथे लोकप्रतिनिधींच्या काम करणेसाठी निदर्शनास आणुन दिल्या पाहीजे .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** ठिक आहे मी ते चेक करून आपल्याला कळवतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांनी घेतल नाही असं ---- साहेब म्हणालेले आहेत.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** त्यांनी पुर्ण रस्त्याचं कामं घेतलेले आहे मला असे वाटते की स्लॅब कल्व्हर्ट चं कामं घेतलेले नाही .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपल्याला ते घेता येईल का हे बघा , आपण त्याच करू काय करायचे ते करू , त्यांनी नाही घेतल असेल कारण त्यांची प्रोसिजर खुप मोठी आहे .

**मा.सभापती :-** भोळे साहेब आपण त्याचा फॉलोप घ्या व काय आहे याचा अहवाल अवगत करून द्या . त्यानंतर आपण ते करू.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** भोळे साहेब बी.एन्डसी चा रस्ता आहे पण आपल्या शहरात आहे आणि आपल्याला करता येणार नाही असे काही आहे का ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** तसे नाहीये त्या रस्त्याचे कन्टीन्यु काम चालु आहे त्याठिकाणी .

**श्री. नितीन लढ्ढा :-** राज्य शासनाच्या निधीतुन जर खर्च झाला तर तेवढा पैसा महापालिकेचा वाचेल.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** घेतला नाही ना तो रस्ता.

**श्री.राजेंद्र पाटील** :- ते फक्त साईडपट्टे करत आहे पुल घेतलेला नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हा पुलाचा विषय आहे ज्याला आपण कल्व्हर्ट म्हणतो. ते कल्व्हर्ट नाही घेतल त्यांनी. त्यांची प्रोसेस फार अवघड आहे. ते आपण करु शकतो ना. घ्या त्याला मनपा फंडात आणि करा. अस नाही ते मोठ सरकार आहे आपले लहान सरकार आहे.

**मा.सभापती :-** तसा प्रशासनाने प्रस्ताव करावा.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** मी त्यांच्याकडे जाऊन येतो. त्यांना सांगतो एन.ओ.सी. द्या. त्यांनी एन.ओ.सी. दिल्यानंतर आपण करु.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांच्या एन.ओ.सी.ची गरज नाही आपल्याला.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** उद्या उठुन त्यांनी असे म्हणायला नको की आम्ही पुर्ण रस्ता करणार होतो.

**मा.सभापती :-** ज्या काही कायदेशीर बाबी आहे त्यांची पुर्तता करुन करा.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** शिरसोली रोड कमीतकमी एक महिना बंद ठेवावा लागेल आपल्याला.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नाही. साहेब पहिले एक बाजु करायची मग दुसरी बाजु करायची. आर्धा तोडायचा मग आर्धा चालु राहील. आर्धा बनवायचा मग नंतर आर्धा बनवायचा. करता येत आपल्याला. आपल्या प्रॉपर्टीचे दवाखान्यांना कलर मारत आहे. आपल डिपार्टमेंट नाही दुसरे कलर मारत आहे आता भाऊंनी सांगितले. बनवा तुम्ही ईस्टीमेट बनवा महापालिकेच्या फंडात बनवा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच पुलावरती रोडावर मोठमोठे खड्डे पडलेले आहे.आर्धा पुल तुटलेला आहे आणि रोडाला खड्डे पडलेले आहे. ते खड्डे ही जर बुजता आले तर बर होईल. कारण त्या खड्डयांमुळे खुप अपघात झालेले आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** राजेंद्र भाऊ फक्त त्या रस्त्यावर पडलेले आहे खड्डे, संपुर्ण शहरात खड्डे पडलेले आहे. तुम्ही मांडा संपुर्ण शहराचा विषय तुम्हाला अधिकार आहे. शहरामध्ये खड्डयात रस्ते आहे की, रस्त्यात खड्डे आहे तेच कळत नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ते तुम्ही मांडलेलाच आहे तो विषय पण हा पुलाचा विषय निघाला तर मी सांगितले तुम्हाला पत्र सुध्दा दिलेले आहे. मला वाटतं आयुक्त साहेबांना पण दिलेल आहे. त्याची ही एक प्रत माझ्याकडे आलेले आहे या खड्डयांच्या बाबतीत. तर लवकरात लवकर ते खड्डे बजविण्यात यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मी टि.पी. इंजिनिअरला विचारु इच्छितो, सन १९९२, शनिपेठ पोलिस स्टेशन ते मागची कॉलनी उड्डाणपुल आपल्या जुन्या डी.पी.आर. प्रमाणे मंजुर आहे. सन १९९२चा आराखडा बघा. तो पुलच मंजुर आहे महाराष्ट्र शासनाचा जी.आर.पण आहे. आता आपण बोगदा तयार करत आहे. ब्राह्मण सभेचा बोगदा आहे. त्या ठिकाणी पुल आहे सन १९९२ पासुन तुम्ही ते का लक्षात आणुन नाही दिल. शिवाजी नगरचा जेव्हा पुल तुटला तेव्हा हा पुल लक्षात आला नाही का यांच्या. सन १९९२ पासुन मंजुर आहे. शनिपेठ पोलिस स्टेशन ते मागची कॉलनी शिवाजी नगर तेथे पुल मंजुर आहे तो. सन १९९२ च्या आराखड्यात आहे तो.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** २४ मीटर डी.पी. रोड टाकलेला आहे त्या ठिकाणी.

**मा.सभापती :-** माहिती घेऊन अवगत करावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कस आहे भाऊ आम्ही बोगद्या संदर्भात पाठपुरावा केला पण काही काही ठिकाणी पाणी नाही काही ठिकाणी लेव्हल भेटत नाही. तर त्यांनी सांगितले त्यापेक्षा हे बरे आहे. हे झाले की ते पण व्यवस्थीत होत.

**श्री.नितीन लढढा :-** ताई याच्यापुर्वी ही जावळे साहेबांनी याचा पाठपुरावा केला. लेव्हल्स मिळत नाही कारण नाला ही वाहतो. आणि लेव्हल्स मिळत नसल्या कारणाने ती गटारी बसत नाहीयेत.

**मा.सभापती :-** त्याबाबत दोन विचारधारा आहे. त्या वेळेला सुध्दा तेथे कन्फ्लीक्टींग व्हयुज होते. प्रॅक्टीकली स्पॉट बघुनच ते ठरविता येईल. डी.आर.एम. साहेबांच म्हणण पडल की त्यांची टिम उद्या येत आहे. या सर्व विषयांवर स्पॉट व्हिजीट करुन सर्व निर्णय घेतल जाईल.

**श्री.नितीन बरडे :-** काव्यरत्नावली चौकातले लाईट का लागत नाही. ५ वर्ष झाले. शिरसोली रोड.

**श्री.सुशिल साळुंखे, विद्युत विभाग :-** तेथील हायमस्ट होता त्याला पर्यायी व्यवस्था टाकुन चालु केलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** दोन लाईट चालु आहे. त्या कोपऱ्यातले चारही पोल किती वर्ष झाले बंद आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, विद्युत विभाग :-** आपण जेव्हा मॅरेथॉन होती तेव्हा चालु केलेले होते. ती केबल टेम्पररी टाकली होती. नंतर ते खोदुन नविन ईस्टीमेट केलेल आहे. ते हायमास्ट खाली उतरणार नाही आणि हायमास्ट खाली उतरल्या शिवाय आपल्याला दुरुस्ती करता येणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** हायमास्टचा सोडा, हायमास्टचे दोन लाईट चालु आहे. तेथुन तर शिरसोली रोड पर्यंत सेंट्रल पोल आहे. चारही पोलवरचे लाईट बंद आहे. त्याच्या नंतर काव्यरत्नावली चौक ते शिरसोली नाका. किती लाईट बंद आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, विद्युत विभाग :-** ते केबल हे करुन घेतलेल आहे. एल.ई.डी. मुळे आपल्याला अडचणी येणार नाही. म्हणुन आपण त्या नविन केबलचा खर्च काही केलेला नाही.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती साहेबा, त्या काव्यरत्नावली मध्ये सिनिअर मंडळी बसता. एकीकडे लेडीज बसतात. एका कोपऱ्यात मुल बसतात. एका कोपऱ्यात मुली बसतात. बरोबर आहे. त्यानंतर जळगांवातील व्यापारी १०.०० वाजेनंतर दुकान बंद करुन येतात. तर १२.०० वाजेपासुन फॅमिल्या बसतात.आंधार राहतो तेथे.

**श्री.सुशिल साळुंखे, विद्युत विभाग :-** ते पुर्ण हायमास्ट खाली उतरेल बाकी काही नाही.

**श्री.नितीन बरडे :-** हायमास्टचा जाऊ द्या. चार पोलचे लाईट सुरु का नाही.

**श्री.सुशिल साळुंखे, विद्युत विभाग :-** तुमचे म्हणणेनुसार आजच पाहुन घेतो आणि बंद असेल तर ते उद्या सकाळी चालु होवुन जातील. फक्त जो केबलचा विषय आहे तो खर्चीक विषय आहे म्हणुन तो पेंडींग आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम मागेच्या वेळेस मी विषय मांडला होता त्याच काय झाल.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** २२५ दुकानदारांना नोटीसी बजविण्यात आलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** किती दुकानांना नोटीस दिली.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** संपुर्ण २२५ दुकानांना नोटीस बजवुन टाकलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** म्हणजे पुर्ण दुकानांना देऊन टाकलेली आहे.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** जेवढे दुकानी आहे सर्वांना देवुन टाकलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आणि आज जे कामे चालु आहे त्यांच काय ?

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** मागच्या सर्वे प्रमाणे आम्ही नोटीसा दिलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आठ दिवसापुर्वी सर्वे काय केला, किती दुकानांचे कामे चालु आहे.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** किरकोळ वसुली विभागानी केलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** कोणीच केलेला नाही. तुमच्याकडे नसेल तर हे ३७ दुकाने आहे. या ३७ दुकानांची नावे आहे. याच्यावरचे नंबर खोडण्यात आलेले आहे. हे ३७ दुकानांचे नाव आहे. तुमच्याकडुन होत नसेल तर हे नावे घ्या आणि सर्वे चालु करा. किती दुकानांचे कामे चालु आहे. कारण या आठ दिवसात कोणीच गेलेल नाही. मागच्या सभेत विषय मांडला ना. हे ३७ दुकाने आहे. या ३७ दुकानांमध्ये जा फक्त बाकी तुम्ही २०० दुकानांना तुम्ही नोटीसी नाही दिल्या तरी ही चालेल.

**श्री.चेतन सनकत :-** फक्त या ३७ दुकानांवर कार्यवाही करा.

**श्री.नितीन बरडे :-** ३७ दुकान आज आहे. का नाही झाला सर्वे.

**मा.सभापती :-** पुढच्या सभेत आपल्याकडुन या विषयावर विस्तारीत अहवाल हवा.

**श्री.उत्कृष गुटे, उपायुक्त :-** मी असेच पत्र देणार होतो. मग यांनी मला पुर्वीच दाखविल की आम्ही या २२७ दुकानांना नोटीस दिलेली आहे आणि त्यावेळेस कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**श्री.नितीन बरडे :-** करारनाम्यात काय आहे साहेब ?

**श्री.उत्कृष गुटे, उपायुक्त :-** जो आपण गाळेधारकांसोबत करारनामा करतो त्यात असे असते की, किरकोळ दुरुस्ती व्यतिरिक्त इतर जे मेजर वर्क आहे ते करतांना मनपाची परवानगी घेऊनच करावे लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** नाही परवानगी घेतली तर काय कार्यवाही आहे.

**श्री.उत्कृष गुटे, उपायुक्त :-** नाही परवानगी घेतली तर तो करारनामा रद्द होतो अटीशर्तीचा भंग होतो.

**श्री.नितीन बरडे :-** कार्यवाही करा त्या दुकानांवर कारण आज ही ५ दुकानांचे कामे चालु आहे.

**श्री.उत्कृष गुटे, उपायुक्त :-** अहवाल मागविलेला आहे. अहवाल आल्यानंतर कार्यवाही करतो.

**श्री.नितीन बरडे :-** अहवाल येणार नाही अजुन दोन वर्ष. त्यानंतर सभापती साहेब आपले उद्याने. त्या साईटने पुर्वी तेथे एक हॉटेल होती. आज ही ती काही काळ बंद पडली होती. आज ती हॉटेल चालु झालेली आहे. तिला परवानगी आहे का गार्डन मध्ये ? आपण परवानगी दिलेली आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** एकच तर रद्द केलेल होत आपण मिटींग मध्ये.

**मा.सभापती :-** आता ही ती हॉटेल सुरु आहे. तर त्याला परवानगी देण्यात आलेली आहे का ?

**श्री.नितीन बरडे :-** जर तुमच्या गार्डन मध्ये हॉटेल चालु होत आहे. तर तुम्हाला इतकीपण माहिती पडत नाही का ? कोण बघतं गार्डनच. जळगांवातले गार्डन सुरक्षित राहतील की नाही.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** सुरवातीला त्याला परमिशन दिलेली होती. त्यानी डेव्हलपमेंटसाठी घेतलेल होत. त्यानी तेथे कॅटरींग सारख चालु केलेल होत.नंतर त्याने तेथे खानावळ सारख चालु केल. मग आपण त्याची ती संपुर्ण प्रोसेस रद्द केली आणि आपल्या ताब्यात घेतल.अतिक्रमण वाल्यांकडुन ते सर्व खाली केल.

**श्री.नितीन लढढा :-** ती परवानगी कॅन्टीनची कोणत्या साईटने आहे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** पाठीमागच्या साईटला.

**श्री.नितीन बरडे :-** हे रेट बोर्ड आहे त्याच मनपाच्या बगिच्यात अनधिकृत हॉटली चालु होत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कोणीही जाऊन तेथे अनाधिकृत व्यवसाय सुरु करतो आणि मनपाला त्याची सुध सुध्दा नाही.

**मा.सभापती :-** हा अतिशय गंभिर विषय आहे प्रशासनाने याची काळजी घ्यावी.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, आपले एक कर्मचारी आहे ते साधारणता दि.३१/०५/२०१८ ला निवृत्त झाले. पर्वी किशोरराजे निंबाळकर असतांना त्यांच्यावर बडतर्फीची कार्यवाही झाली होती. बडतर्फीची कार्यवाही रद्द करण्याच्या अनुषंगाने तत्कालीन स्थायी सभापतींनी तसा ठराव केलेला होता. पुन्हा त्यांना कामावर घेण्याच्या दृष्टीकोणातुन या स्थायी समितीने निर्णय घेतलेला होता. त्या वेळेला तो ठराव राज्य शासनाकडे विखंडनाला पाठविण्यात आला होता. राज्य शासनाकडुन दि.२८/०५/२०१८ तो निर्णय आला की, मनपाने आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. साधारणता दि.३१/०५/२०१८ रोजी ते रिटायर झाले. रिटायर झाल्यानंतर काय झाल की, सेवानिवृत्तीनंतर जे फायदे आणि लाभ त्यांना मिळायला पाहिजे. या कारणामुळे मिळु शकत नाही की याच्यावरचा निर्णय अजुन पर्यंत प्रलंबित आहे. मग आपल्याला दि.१०/१२/२०१९ रोजी पत्र दिलेल आहे. अश्या पध्दतीने पार्श्वभुमी त्यात व्यक्त करुन की, अश्या पध्दतीने न्याय मिळावा. परंतु गेल्या २० दिवस झाले तो प्रस्ताव प्रशासनाकडुन पुन्हा आपल्यापर्यंत आला नाही. जेणे करुन त्या कर्मचाऱ्याला.

**श्री.अजित मुठे, उपायुक्त :-** सन्मा.सभापती आणि सन्मा.सभागृह फक्त सुरेश बळीराम सोनवणे नाही असे जितके ही बडतर्फ झालेले आहे किरकोळ कारणावरुन त्यांची सर्व फाईली तयार करत आहोत.जवळ जवळ १७ फाईली आहे. त्या आयुक्त साहेबांकडे मंजुरीसाठी. जवळ जवळ असे की, जागेवर नाही आहे बडतर्फ अशी फाईली ही आढळलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** येत्या आठ दिवसामध्ये त्याचा निर्णय होईल का ? कुठेतरी त्याला वेळेची मर्यादा द्यावीच लागेल ना. मला सांगा, तो कर्मचारी ज्याने येथे २०-२० व ३०-३० वर्ष सेवा केलेली असते. आणि त्या सेवा निवृत्तीनंतर त्याचे लाभ आणि त्याचे फायदे त्याच्या कुटुंबाला आणि त्याला मिळत नसतील तर ही शोकांतीका आहे. आणि त्याच जर सेवापुस्तक बघितल तर त्याच सेवा पुस्तक अत्यंत चांगल आहे. कुठेतरी चुकीच्या कारणाने अश्या व्यक्तीच नांव कोरल जातं. या सर्व गोष्टींचा दुखद या आयुष्यामध्ये येत असतो.

**मा.सभापती :-** हे सगळे प्रस्ताव केव्हा पर्यंत येणार.

**श्री.अजित मुठे, उपायुक्त :-** तीन चार दिवसात करतो.

**श्री.नितीन लढढा :-** कारण कस आहे. खुप त्रासात आहे ती व्यक्ती.

**श्री.अजित मुठे, उपायुक्त :-** मला ही जाणीव आहे त्या गोष्टीची.

**मा.सभापती :-** मी स्वत: या विषयावर मुठे साहेबांशी चर्चा केलेली होती. सुरेश बळीराम सोनवणे माझ्याकडे ही येवुन गेलेले होते. आणि या चर्चेच्या वेळेलाच साहेबांनी सांगितल की, असा हा एकच विषय नाही असे अनेक विषय आहे, तर एकत्रीत प्रस्ताव आम्ही सादर करतो.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, रु.४८९/- आपण त्यांना वेतन अदा करतो. परंतु प्रत्यक्षात रु.२५०/- हातात मिळत. या संपुर्ण विषयावर आपण इतकी चर्चा करुन घेतलेली आहे की, परत चर्चा करण्याची इच्छा या सभागृहात राहिलेली नाही. तुम्ही बघा माझ्या प्रभागातील परिस्थिती दाखवतो. आणि ती स्वत: सॅनेटरी इन्स्पेक्टरने दाखविलेली परिस्थिती आहे. मी सांगतल की, तिथली बोळ साफ करा आणि तेथील परिस्थिती काय ती अवगत करा. ती परिस्थिती दाखवितो तुम्हाला आपल्याला ही वाटेल की, असे ही भाग आपल्या जळगांवात आहे का ? जे उघडया डोळयांनी आपण बघु शकत नाही. एकीकडे कामाच वेतन कमी मिळत असेल म्हणुन त्याच कामावर दुष्परिणाम होत आहे का ? की फक्त काम नावावरच चालु आहे. आपण शहर स्वच्छतेचा ठेका दिलेला आहे की, कामागारांची पिळवणुक करण्याचा ठेका दिलेला आहे. म्हणजे कामगार समाधानी नाही. आपण समाधानी नाही. नागरीक समाधानी नाही. मग चालु काय आहे. तुम्हाला फोटो दाखवतो मी.

**श्री.चेतन सनकत :-** रॅम्पच पण बघा. रॅम्पची काय परिस्थिती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** डॉक्टर साहेब भेटुन बघा की काय परिस्थिती आहे.

**मा.सभापती :-** आजच्या आज कारवाई करा आणि पुन्हा अशी परिस्थिती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२० दि.१०/१२/२०१९ अन्वये शिवाजी नगर भागातील मनपा आयुक्त निवासस्थानातील बागेत गार्डन लाईट्स उभारुन सुशोभिकरण करणे व निवासस्थानासभोवती एलईडी स्ट्रीट लाईट फिक्चर्स बसवुन लाईट व्यवस्था करणे कामी मक्तेदार न्यु आर.के.इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतके सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.४,३८,२९७/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- खडके सुनिल वामनराव**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**